

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2857

REFBK-0023570
REFBK-0023570

# तिन्हीसांजा


जयप्रकाश दगडे

ति न्हो सां जा

# ॥ तिन्हीसांजा ॥

जयप्रकाश दगडे

REFBK-0023570
REFBK-0023570



या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या
नवलेखक अनुदान योजनेंखाली
अनुदान मिळाले आहे

~

प्रकाशक
प्रमोद मधुकर नंदुरे
पांडे चौक, बार्शी

~

© प्रकाश दगडे
३३३०, महावीर मार्ग, बार्शी

~

मूल्य रु. सात फक्त

~

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लि.
४०५ नारायण पेठ, पुणे ३०

प्रिय राजू–

काही कविता
तुला वाचून दाखवायच्या राहिल्या
त्या सगळ्या
आता तुला देतोय्.

– जयप्रकाश

काव्य २२५७८२
ग्रं. शाखा (स्थळ प्र.)

सगळ्याच शब्दांना कुठले आकाश असायला !

काही शब्द बापुडवाणे
कोपऱ्यामधल्या सहीसारखे
बरेच काही तालेवार
नव्या कोऱ्या वहीसारखे
गहिंवरलेल्या काहींमुळे कधी होते फसायला !
सगळ्याच शब्दांना कुठले आकाश असायला !

काही थोडे तुडवतात
मन नसलेल्या वाटा
पेटवीत जातात रानोमाळ
संदर्भांच्या गाथा
सायबासारखे काही असतात रुबाबदार दिसायला !
सगळ्याच शब्दांना कुठले आकाश असायला !

काही शब्द तुटीचे
थोडेफार जुटीचे
काही शब्द अलगुजी
घट्ट घट्ट मिठीचे
रात्रीसवे बेटे काही कधी उठतात डसायला !
सगळ्याच शब्दांना कुठले आकाश असायला !

काही मुन्शीपाल्टीच्या
कुंडीमधला पाचोळा
काही अगदी मांडणीतले
शंभर रुप्पय तोळा
कधी लावतात हसायला, कधी मुसमुसायला !
सगळ्याच शब्दांना कुठले आकाश असायला !

येऊन जा येऊन जा
पायजेल ते घेऊन जा
दोन छदाम फेकून जा
चार सलाम घेऊन जा.

पोटासाठी गाळलेला
हलकट घाम घेऊन जा
जमलेच तर थोडाबहुत
अंधार शिल्लक ठेवून जा.

व्यासपीठावर माईक धरून
शंभर नंबरी बोलून जा
माणसामधल्या माणसाचेही
भिकार नरडे सोलून जा.

होतोय इथं सौदा अरे,
डोळ्यांमधल्या पाण्याचा
स्वस्तात जातोय लिलावही
गळ्यामधल्या गाण्याचा.

आता काय राह्यलंय् दोस्त,
साडे तीन हात आयुष्यात
पेटलीय होळी स्वप्नांचीही
झोळीत राख घेवून जा.

लाचार जिणे थुत् असले
जगण्यावर या थुंकून जा
थुंकताना तरि झुक साल्या,
मग पायजेल तेवढे थुंकून जा.

दूरस्थ मी उद्ध्वस्त मी, की जाहलो स्वप्नस्थ मी !
इतुके परी जाणा खरे, झालो मुळी ना स्वस्त मी ! !

मी व्यस्त हो रात्रंदिनी माझ्याच धुंदीत मस्त मी !
अपुलेच परि छळिती असे, होतो जरा संत्रस्त मी ! !

की पिऊनी होतो तृप्तसा डोळ्यांतले सूर्यास्त मी !
आभाळ परके पाहता, होतो पुरा अस्वस्थ मी ! !

वाटा अशा या गुंतल्या तरि चालतो पांथस्थ मी !
सुखदुःख मजला सारखे त्यांचा असे मधस्थ मी ! !

करतोच ना पर्वा कधी ही पौर्णिमा की अष्टमी !
प्रत्येक संध्याकाळि हा, होतो असा सूरस्थ मी !

या बंद बंद वाटा आभाळ कोंडलेले
सकवार जिंदगीचे बाजार मांडलेले

डोळ्यात पेरताना लाचार स्वप्नबीजे
हांसूसवे निमाले अश्रू लवंडलेले

आता भणंग आत्मे मजबूर बेबसी ही
बेजान प्राक्तनी हे आयुष्य कांडलेले

अवघी वठून गेली झाडे मनांतलीही
वाटेवरी विराणे निःश्वास सांडलेले

म्हणुनीच देह सारे मातीस वाहुनीया
खड्डे अम्हीच अमुचे स्वतःच खांदलेले

सावलीसुद्धा अंधारात देत नाही साथ
सारी पाखरं उडून जातात फसवित हातोहात.

कोण कुठले सगेसोयरे कसची नाजुक नाती ?
उरते फक्त वाटेवर गहिंवरलेली माती.

गहिंवरलेल्या मातीवर तळव्यात रुततो खडा
तेवढाच मनाच्या अंगणात प्राजक्ताचा सडा.

भटकत असतं कोणी एक सुनसान रानोमाळ
हळूच ओवाळून टाकतं रक्ताळलं आभाळ.

किती बरं झालं असतं नाही...
भावनांवर व्यवहाराचा पेपरवेट
ठेवता आला असता तर !
निदान या मनोवांच्छितांची
कफने
झाली नसती अशी पोरकी सांध्यव्याकूळ तरी !
भावनाच शेवटी आज
सुळावर चढविल्यात.
आता तसा निश्चिंत आहे.
व्यवहाराचे खिळे
आयुष्याच्या भिंताडावर
आता जाम पक्केच.
हो, एक मात्र वेड हल्ली
पथरिल्या डोळ्यात नवंच उगवतं आहे...
निःशब्द वांच्छितांची
हंसरी प्रेतं शोधण्याचं.
हे सदय पांथस्थांनो,
ते तेवढं राहू द्या
कृपा करून.

अक्षरांचा व्यापार करतोय मी !
करायचीय मला नवनिर्मिती
एका ‘ अक्षर ’ प्रतिमेची
प्रीतीच्या उत्कट अनुभूतीनं साक्षात्कारित अशी
अन्
पूर्णत्वाच्या वेदनेनं जिचा किनारा स्पर्शिला आहे, अशी.

कारण...
मला एक अनन्त शोध घेणे आहे,
माझ्या हरवलेल्या चेहऱ्याचा !
पेश करायचाय् हा का काटेरी उपहार...
आयुष्याला काहीतरी
‘ फिलॉसॉफिकल डायमेन्शन ’ असावी म्हणून !

पण...
या झिझू झिझू डोळ्यांमध्ये
का शोर मचवून राहिलेत
आठवणींचे समुद्र?
खळबळ माजवणाऱ्या या व्यापारात
हा मुसमुसण्याचा मनहूस आवाज...
कुणाचा येतोय... ?
हे कुणाचं अभागी अश्रुसिंचन आहे...?

अरे...
हे तर अश्रू आहेत
—माझ्याच कवितेचे!

पायरस्ता अन् धुळीने पार या माखून गेला
राहिलो एकान्तस्वामी काफिला निकळून गेला.

डोळ्यात माझ्या चांदणे शतदीप होते ओंजळीत
आरती ओवाळताना चंद्र होता सावलीत
देऊनी हा क्रूस हाती वेदना माळून गेला ... राहिलो...

जिप्सी पुरा मी जाहलो धुंडाळता या रानवाटा
टाकिल्या माना तृणांनी विसरुनी प्राजक्तलाटा
फत्तरी स्वप्ने फुलांना काहिली देऊन गेला... राहिलो...

शब्दही कैसे फुलावे, मौन हे आभाळ झाले
देहमेणा पेलताना, आसवांचे माळ झाले
आणि माझा सूर्यराजा कबरही जाळून गेला...

राहिलो एकान्तस्वामी काफिला निकळून गेला !

दुःख होते विश्वव्यापी
निशागूढ व्यथा,
जागेवरती सुकून जाते
रक्तातली कथा.

पापण्यांनी खिन्न होतो
आर्त अश्रूकांठ,
शून्यामध्ये हरवते
एक पायवाट.

विरहाग्नीने होतो
कासावीस जीव,
पोळलो आगीत, होते
एकच जाणीव.

ओसाड जीवनी अशी
चमकली वीज,
उमाळा दाटतो, नाही
नयनात नीज.

आठवांचा पूर येता
तुझी छेडावी गझल
दंव–भिजल्या पहाटे
होती नयन सजल.

आठवांचा पूर येता
राती तिसऱ्या प्रहरी
माझ्या हृदयाची व्यथा
होते गहिरी गहिरी.

आठवांचा पूर येता
सले पुष्पाचा ग शूल
उरी कवटाळितो मी
आणि पाकळ्या मलूल !

या डोळाभर अंधारात
मी रोजच कुंभीपाक मरणं भोगतो आहे...
उजेडात जगता यावं म्हणून !

माझ्या झुकल्या खांद्याना,
कुणी कुणास ठावे,
करकचून आवळलीय्
एक लांबलचक अपरिहार्य श्रृंखला.
अधिकाराचा चतकोर मात्र
गिळून बसलीएत
संधिसाधू सुस्त गिधाडं.
चुना मळलेल्या तंबाकुसवे
वैश्विक सत्याच्या गप्पाही
बऱ्या असतात चघळायला.
अधूनमधून ' हे विश्वचि '... किंवा
Man ! Thou pendulum betwixt smile & tear...सारख्या
अवतरणांचे खिळे ठोकले की बास् !
( घ्या भिंत भिंत, लेको ! )

– तसा मी कधी कधी स्वप्नंही बघत असतो
छान छान...
जग बदलून टाकण्याची...
प्राचीने उजळलेल्या आभाळाची ...
आणखी कसली कसली !
( च्यायला ! डास फार माजलेत.
मुन्शीपाल्टीला एकदा कळवायला पायजे ! )
समाजवाद साम्यवादावर
उधळतो रोजच
शब्दांची कागदी फुलं !

–हल्ली मात्र चौकात उभं राहून
माझ्या आदर्शाचं कफन फाडून
स्वतःला ' एक्स्पोज ' करीत असतो.
भय इतरांचं नव्हे,
घमन्यातल्या नागड्या पशूचंच वाटतंय.

चंद्र विरूनीया गेला खिन्न आंधळ्या तमात
परि उजळूनि येती माझे चांदण्यांचे हात.

माझे चांदण्यांचे हात आज नाहती सुखात
जणूं वसुधा चिंबावी सांद्र ओलसर धुक्यात.

रात बहरूनी जाते फुले चन्देरी ही नक्षी
माझ्या चांदण्यांच्या हाती अश्रुआनंदाचे पक्षी

निशिगंधाचा उन्मेष आज एकवटे दिठी
ह्याच चांदण्या हातांची गंध भारलेली मिठी.

गंध भारल्या मिठीत माळ तेजाची गुंफीत
लक्ष कळ्यांना स्पर्शिती माझे चांदण्यांचे हात.

असह्य मुकाटपण
रस्त्यावर उतरलंय...
अस्वस्थ वारा
झाडांमध्यें चिडीचूप...
माझ्या गाण्यासारखा,
बरगड्या काचणारा
गहिरा काळोख
कोरतो आहे यातनाशिल्पे...
कलत्या भिंतीवर.
सर्द प्राणगहन आभाळ
डोळयात पारदर्शी होवून...
साकळतं आहे.
एक सांगशील ?
...तू खरंच श्वासात आरती घेऊन
उभा होतास माझ्या वाटेवर, की...
......................!

—वासनांची भुतं
हाती मशाल नाचवीत
बाहेर पडायची वेळ झालीय्
कदाचित् म्हणतीलही ती मला
खदाखदा दात विचकून...
'आता तू राम म्हणावेस!'

उगा बहरतो अंगाअंगावर
स्पर्श चंदनी...
बावरते रे चैत्र कोवळी
पतझड नयनी...
असे कोरते स्वप्नपाखरू
धुन्द आठवण...
आणि अचानक जुनापुराणा
हुळहुळतो क्षण.

अवखळ धुंदीत वारा गंधीत धावती वाट
देहात पेटुनी उठली एक अनामिक लाट

क्षणमात्र थरारुनि गेली जणू अजिंठा लेणी
डोळ्यात हरवला हळ्व्या नदीकांठचा घाट

क्षितिजाच्या रेषेवरती हा चंद्र मावळे थोडा
हृदयात जपूनी ठेव ही वादळवेडि पहाट.

कितीक वर्षे होउनि गेली
माझे जीवन जीवन होते
अधरावर स्मितरेषा होती
अन् हृदयी संजीवन होते.
गर्भरेशमी आठवणींचे
असे कोवळे स्पंदन होते
हळवीशी नक्षत्र पाऊले
जीवन कसले चंदन होते.
माझ्याही बागेत कधीतरि
वृन्दावन हो फुलले होते
माझ्याही जागेत कधीतरि
नवचैतन्य उसळले होते.
माझ्याही जीवनवृक्षाच्या
शाखा शाखा हिरव्या होत्या
चंद्र सवे घेउनी येणाऱ्या
श्यामल राती बरव्या होत्या.
आता जगणे जराग्रस्त जणू
खुरडत खुरडत सर्पावाणी
गातिल का मावळती किरणे
माझ्यासाठी जीवनगाणी ?

या संध्या समयी
रंग आज ओसरले
मधुस्वप्न पापणीतील
धुंद रे विरले
पंखांची हळव्या
फडफड केवळ आता
अन् गहिवरलेले
पक्षी उरात उरले !

आज अचानक असे
तुझ्या डोळ्यात वादळ
लपे पापण्यांच्या खाली
झाले व्यथित काजळ.

विश्व-व्यापल्या धुक्याला
कसा घालू मी आवर ?
कंठातून उफाळतो
दाटलेला गहिवर.

नितळ नितळ पाऊली
आज वितळे नजर
भिनलेली धून
माझा दुःखस्वी गजर.

काजळली संध्याकाळ
रंगनक्षी क्षितिजाला
मनी दाटे निरोपाचा
अश्रू-आनंद ग ओला.

असह्य वियोगाचे
ओझे पेलेना पेलेना
नेत्रकुम्भ कलंडले
पूर थांबेना थांबेना !

संगती कोणी न ये भोवती नाती किती ।
हासुनी खोटे मुखवटे नाना परीने सजविती ॥ ...भोवती...

पेलता खांद्यावरी मी ही पताका वेदनांची ।
पाहती निर्लेप सारे शैशवातिल सोबती ॥ ...भोवती...

एकही बाहू न ये पुसण्यास आसू डोळिचे ।
बघुनि हे, सारेच अश्रू गेले अखेरीला सती ॥ ...भोवती...

का कुणी कवितेस या सुकविले ऐसे कसे ।
का उगा अश्रू फुले ही सुन्नतेने ढाळिती ॥ ...भोवती...

हृद्‌बंध सारे तोडुनी दूरस्थ का आभाळही ।
वाकुल्या मज दाविती ज्वाळा चितेच्या शेवटी ॥

...भोवती नाती किती...

बेजान गिरविलेल्या तुमच्या धुळाक्षरांनी
आयुष्य गोठलेले बर्फाळल्या सुरांनी.

बोलीत लिलावांच्या बिंनधास्त दलालांनी
माणूस मोजलेला साताठ मोहरांनी.

बेवारशी फुलांच्या श्वासात झेललेले
रक्तामधील गाणे असहाय पाखरांनी.

झोळीमधील जपतो गजरे अम्हीच अमुच्या
प्रेतास साज द्याया त्या छत्रचामरांनी.

विसरून जन्मदेला की दूध बाटलीशी
अस्तित्व जोडलेले तिन्हीकाळ लेकरांनी.

बेजान गिरविलेल्या तुमच्या धुळाक्षरांनी
आयुष्य गोठलेले बर्फाळल्या सुरांनी.

ओठांचे व्याकुळ पक्षी
पंखांची फडकड असहाय
जखमी पापण्यात
दाटलेलं कारुण्यक्षितीज.
अंधारच जगणारी विकल चोंच.
ओंजळभर शब्दांची राऊळे
आता रिकामी रिकामी.
मूक साहणे केवळ...
गाभारवेदना.
शिशिरभेटींचा त्या सरल्या
तुला असा विसर पडावा ना!
आता तरी गात्रेस...
कवेत घ्यावेस ...
झुकल्या नभाचे माझे घरटे
वादळी.
... ... ... ... ... ... ...!
—तुझ्या मौनालाही
असा
जीवघेणा अर्थ असावा ना!

खिळलो असा इथे मी या शब्दकुंपणाशी
कां डंख काजळीचा लेवूनि मेघ आले...

काचेत गोठलेली स्वप्ने कितीक माझी
आयुष्य-पीयुषाचे विष हे जहाल झाले...

किती वेदना सहाव्या किती वादळे जपावी
बेहोष पालखीचे कितिएक हाल झाले ..

हृदयस्थ भावनांना नख लागले असे की
डोळ्यातले फुलेना आभाळ माळलेले...

दशदिशा विंधूनिया रक्ताळलो असा की
वाटेतल्या फुलांनी अश्रू बहाल केले ...

कसे मिटावे मधले अन्तर
असता तू दूरस्थ,
विझले सारे मार्ग दिवे अन्
डोळ्यांमधि सूर्यास्त.
पैलतिरावर जळते माझे
परकेसे आभाळ
ऐलतिरावर उभा असा मी
एकाकी उध्वस्त.

माझ्या हातांनो —
विसरलात इतक्यातच ?
तुम्हीच झुकविलं होतं ना एकदा
उद्ध्वस्त आकाश ...
तुमच्या प्रमाथी शक्तिच्या बळानं ... ?
तुमच्याच ना सामर्थ्यावर मी
ओरडत होतो क्षीण आवाजात —
' ईश्वर ... मानवता ... सबकुछ झूठ आहे ...' म्हणून ?
तुम्हालाच —
तुम्हालाच ना ओढ होती ... ...
अनन्ताच्या स्वरात स्वर मिसळण्याची,
वीणेच्या समर्थ तारा झंकृत करून ...?
कुठाय ते बळ आता ?
अन् ती वीणा आज अशी अचानक
कां निसूर झालीय ?
जलप्रलयाच्या तडाख्यात सापडलेल्या
एखाद्या असहाय्य जीवाप्रमाणं ...
ऊर्ध्वगामी होवून —
तुम्ही कुणाला पुकारताहात
' त्राहि माम ... त्राहि माम ...' म्हणून ?

आषाढता दाही दिशा
खांद्यावरी हे पाप ओझे
जाळिती स्वप्ने उद्याची
सूर्यसाक्षी शाप माझे.

झाकुनी चेहरे स्वतांचे
सजविले खोटे मुखोटे
स्वप्नातही कां या फुलांना
बोचणारे तीक्ष्ण काटे.

रचित जातो मी स्मशानी
जीवनाची आर्त गाणी
आणि मी ती गात असता
भैरवी डोळ्यात पाणी.

तकदीरवाले दोस्तहो—
कां आव ह्या आणता बळें ?
कवितेतही आमुच्या अम्हाला
मरण नाही लाभले.

सनई अशी व्यथांची फुलवीत सांज आली
हळुवार पापण्यांना खुपतो शिशिर आता...

जपणे उरी कशाला हे ताज आठवांचे
का आज पाखरांनी व्हावे अधीर आता...

का मीन तळमळावे अधरावरील प्यासे
प्यासेच ओंजळीत माझे शरीर आता...

काळोखुनीच आले बंदिस्त शब्दवणवे
हे पेटते निखारे माझे कसूर आता...

आवरू कसे कळेना अगतीक हुन्दके हे
आभाळ शोधताना चुकला फकीर आता...

ही जन्ममृत्यूची यात्रा, मी यात्रिक एक तयात
हा अविरत चाले तांडा शतनवस फेडूनी घेत.

कधी आढळती यात्रेत किती अनाम दुःखित वाटा
कधी ह्रदय अनावर होते वर्षता आनन्दी लाटा.

कधी होति फुलांचे काटे, कधी पुण्याचेही पाप
ही मिळकत आयुष्याची आशीर्वच होती शाप.

या जगी जन्म घेताना मजजवळी काही नव्हते
अन् आज संपता यात्रा मम शिरी गुन्ह्यांचे ओझे.

फक्त एकदाच –
होवू दे तुझा हस्तस्पर्श लाघव
माझ्या विझल्या रोमांचांना
फक्त एकदाच –
दे तुझ्या मधाळ स्मिताची किनार
वेदनांना माझ्या अश्वत्थामी
फक्त एकदाच –
पेटू देत हृदयात तुझ्या
लक्ष लक्ष दीपज्योती
काळोख पांघरलेली माझी हळवी पाऊलवाट
प्रकाशण्यासाठी... क्षणभरच !
फक्त एकदाच –
आणखी एकदाच...
सावरून धर
भावदोहक तुझ्या डोळ्यांमध्ये
अश्रूंचा सुंदरसा घाट
माझ्यासाठी
केवळ माझ्यासाठी !

—आणि तू मला चंद्र मागत्येस.
कुठून तुला दिसावे
शतविदीर्ण माझे आभाळ ?
चिंध्या घेऊन आयुष्याच्या
मी असा रानोमाळ
भटकणारा जिप्सी जणू... ...
आणि तू मला चंद्र मागत्येस.
कशी कळावी तुला
पानगळ... ...
माझ्यातल्या संन्यस्त झाडांची ?
तू अशी –
सदैव सावलीलाच.
मी तुला केवढं बजावलं होतं !
—तरीही तू मला चंद्र मागत्येस !!

आपुली आपण जाणावी पायरी
स्मृतींची डायरी संगती असावी.

झाकळून आले दुःखाचे सावट
झाली मसणवट आयुष्याची.

उगा ओलावल्या कवितेच्या ओळी
डोळियांचे जळी बुडोनिया.

कसला चंद्र कसली किरणे
प्राक्तनी झुरणे सदाचेच.

तुझे चन्द्र सूर्य तुला लखलाभ
विचारू मी जाब कोणापाशी ?

ही व्यथा जाळते आभाळ वादळस्पर्शी
की उरात हळवी मोहरलेली नक्षी
ते ओंजळीतले क्षण असे हरवले
डोळ्यातील विझले स्वप्निल सारे पक्षी.

एक गाभुळलेलं... आर्त आभाळ
गच्च धरून डोळ्यात...
कशाला उगाच
वाहिली होतीस माझ्या पायांशी
मुग्धावल्या प्राजक्ताची गंधभारली ओंजळ ?

तुडवायचीच होती ना पायांखाली,
मग कशाला उगाच
भोगली होतीस
हळव्या पापणकडांवर रेंगाळलेली
अनाम स्वप्नं ?

कशाला उगाच
पांखरल्या होत्यास
स्वप्नदिठीतून झरणाऱ्या स्वप्नकळ्या... ?

आता कशाला उगाच
माझ्या स्वप्नात तरी येतेस,
नग्न भग्न आयुष्याला
आणि ठिगळ देतेस... ?

धुंद शब्दांतुनी तुझ्या
कधी ओघळे मोहर
आणि मुक्त निर्झरीचे
थरथरणारे स्वर.

मंद चालण्याने तुझ्या
चुकती ठोके काळजाचे
येते ओंजळीत माझ्या
स्वप्न वेड्या पांखराचे.

स्वप्नकळ्या पांखरती
तुझे कुंतल श्यामल
आता बागेतही माझ्या
वेडा गुलाब फुलेल.

आता सरूनिया गेला
गर्भ रेशमाचा मोह
आयुष्याच्या नदीमध्ये
रिता उदाससा डोह !

गेली आर्द्रता सम्पून
आता कसला ओलावा ?
निर्माल्या फुले हाच
आता माझा गे विसावा !

तरी उघडू पहातो
माझे पुस्तक हळवे,
त्यात जपलेले फूल
त्याच्या पाकळ्या मल्लूल !

माझ्या अस्वस्थ अन्तरी
कशी गवसावी खूण ?
काठ हरवल्य राती
आज वेदना भोगून ! !

या शापित आयुष्यात
अशी बरसली तुफानं...की
मी माझ्यापासूनच वेगळा होऊन
मिटत होतो.
एका अद्वैत निर्मिण्याच्या केविलवाण्या प्रयत्नात!
ही दिशाहीन पावलं
भटकतच राहिली चिंध्या होऊन...
एक साखरकळीच्या असीम शोधात!
कुरवाळली होती मी
लक्षावधी चांदण्यांची कूस.
विसावलं होतं माझं 'चिमणं' स्वप्न
चंद्राच्या लोलकात!
पण त्यालाही कलंक होता
तुझ्या लाचार संभोगाचा.
ढाळली होती मी कितीकदा
माझ्या रक्ताश्रूंची भावफुले
सत्याच्या स्मशानात दडलेल्या स्वप्नांच्या नावानं...

त्या संध्याकाळी
सूर्य अस्तलाच नाही
तरी परंतु ढळतच होता,
आणि घुसमटलेल्या
माझ्यातला मी...
सोडून सारे गुन्हे
तुझ्या बेवारशी मजबुरींच्या नावानं
चालतच होतो...
तिरस्कृत नजरेची फाटकी शाल पांघरून...
...कोणत्या मरूभूमीकडं
... कुणास ठाऊक!

एका जडशीळ संध्याकाळी
दाखवले होतेस तू...
एकदा...
मनाच्या दुखऱ्या क्षतीजावर
भिरभिरणारे
दोन नक्षिले स्वप्नपक्षी.
डबडबल्या तुझ्या डोळ्यांनी
म्हटलंही होतं
हरवता हरवता कुठंतरी...
'कधी रे संपेल ही उपेक्षा...?'
या तुझ्या छळवादी प्रश्नाचं
'मूळ' उत्तर
एकदा...
नि फक्त एकदाच
तुझ्या थरथरल्या ओठांच्या पाकळ्यांवर
टिपलं होतं मी—
एका सरत्या संध्याकाळी...
एक जख्मी वादळ पिता पिता...!

रानफुलांनी माळावरच्या तम पांघरला होता
सहज पाहिले तुला साजणे गहिवर आला होता.

विकल व्यथांची एक पालखी
शब्द अनामिक मिरवीत गेले
आणि पांखरू अर्थामधुनी
निळे मनस्वी हरवत गेले

चांद जरासा कलला. नयनी श्रावण झरला होता
सहज पाहिले तुला साजणे गहिवर आला होता.

सान्द्र धुक्यातिल वाटेवरती
अश्रु सांडले पैंजणातुनी
सुरावलेला खिन्न जोगिया
हळव्या गहिऱ्या ओठांमधुनी

टपटपलेल्या श्वेतफुलावर दवबिंदू ओघळला होता
सहज पाहिले तुला साजणे गहिवर आला होता.

पाढा अता व्यथांचा मी वाचणार नाही
बोटावरी दुज्यांच्या मी नाचणार नाही

डबक्यात भीत कुजलो, विझलो असा परंतू
एकाच ठायि आता मी साचणार नाही

झाले जरी कितीही आभाळ आंधळे हे
दुःखासुखात माझ्या मी जाचणार नाही

पचवीन हांसुनीही कित्येक वादळे मी
दोरापरी तयांना मी काचणार नाही

बेपीर मी प्रवासी, स्वामी कुणी न माझा
जेव्हा असेल मृत्यू मी वाचणार नाही
पाढा अता व्यथांचा मी वाचणार नाही.

टांगलेली ओळिने ही जीवनाची लक्तरे
आसवे करिते खरेदी ही सराई फक्त रे.

इथले खरेदीदार मत्त त्यांचिया सौद्यातल्या
उद्ध्वस्त बंदिवान हो, यांचे पहारे सक्त रे.

किती सूर्य अमुचे वेधुनी इतिहास हा खुषमस्कऱ्या
जेत्यासची करितो बहाल ताज आणिक तख्त रे.

येथ तमगारात या किती जीवने सांजावली
प्यास यांची शमविते अमुचे पुरातन रक्त रे.

हिमथंड ऐशा वेदनांनी मांडण्या सजल्या इथे
तरि जिण्यांचे भार पेलित पापण्या स्वप्नस्थ रे.

बंदिस्त काचेआड झाल्या काळजाच्या चिंधड्या
सरणात येती गहिवरोनी डोळियांची फत्तरे.

टांगलेली ओळिने ही जीवनाची लक्तरे
आंसवे करिते खरेदी ही सराई फक्त रे.

दूर मार्गस्थ होताना
नको पाहूस वळून,
माझ्या मनाचे क्षितीज
आता गेले ग जळून.

नादवीणा दुभंगली
झाले परके आकाश,
अक्षुण संध्याकाळी
झाला धूसर प्रकाश.

सांजव्याकूळला डोह
स्पर्शवादळे नुरली
झाली मलूल मलूल
आज कोवळिक ओली.

आता ढासळतो आहे
वेड्या स्वप्नांचा मनोरा,
आता हरवतो आहे
माझा सोनेरी किनारा!

माझ्या संज्ञेचा पारा
आज तुटून पडला आहे.
रडतंय, इथं मानवाचं
चिरदुःख—
हतभागी गुडघ्यात दुर्दैवी मान खुपसून
शतकानुशतके,
पहातंय् न्याहाळून
जिन्दगीच्या तडकलेल्या ऐन्यात
स्वतःचं मनहूस प्रतिबिम्ब !
कवटाळू दे मला
त्या अभागी वेदना
हुंदक्यांच्या घुमाऱ्यात फुललेल्या !

कुरवाळू दे मला
प्रकाशाची कूस एकदा तरी!
घालू दे एक
हळुवार स्नेहाळ फुंकर
निखारे दडपणाऱ्या राखेवर.
आता तरी शोधू दे—
रानावनात मनामनात
पेटलेले
बंदिस्त शब्दवणवे!
...पण
माझ्या संवेदनाचा
शरच कुठंतरी हरवलाय रे!!

सांज तिरपली
ऊनही कलले
मौन माझे गीत
शब्दरूप झाले.

पावलांशी माझ्या
क्षितीज गुंतले
स्वर जळाचेही
धुक्यात दाटले.

कसे कुणा ठावे
आगळे घडले
स्वप्न पांखराचे
ओंजळीत आले.

तू मोहरताना ...
श्यामल ओल्या वेळी
मी प्राणफुलांचे
गीत उरी फुलवावे !

तू मोहरताना ...
गंधित वेडे वारे
या दो हातांनी
दहा दिशी उधळावे !

तू मोहरताना ...
स्वप्न नक्षिले पक्षी
तव डोळ्यातिल, मी
उरामधी झुलवावे !

तू मोहरताना ...
भाव अनोखे व्हावे
चांदण्यात अन् त्या
स्वैरपणाने न्हावे !

तू मोहरताना ...
सदाफुली लाजावी
अन् शब्दांविण गे
अर्थ जुळूनी यावे !

तुला आठवतं ?
एक मखमली अनादि आकाश
तुझ्या पापण्यांच्या सावलीत
ओथंबून आलेलं ... ?
अंधाराचा एक रेशमी थेंब
आपल्या अस्तित्व परिघानं
व्यापत होता
दुनियेचा कण कण.
धुंद मोगऱ्याचा तुझ्या
वेड लावणारा गन्ध ...
देहाची पालवी मोहरविणारी
तुझी मोरपंखी स्पर्शवादळे ...

अजाणताच भरून आलेलं
खुळ्या शब्दांचं आभाळ...
दूर कुठं क्षितीज रेषेवर
पेटून उठलेला
हळवा गुलमोहोर...
खरचं, तुला आठवतं ?
ठेवलीत जपून मीही
मनाच्या अजिंठ्यात...
त्या थरथरत्या क्षणांची
कातर शिल्पे...
जी कोरल्यानंतर
अक्षय रहातात म्हणे !

उधळला मी सारीपाट डाव अधुरा राहिला
सजविल्या माझ्या व्यथा अंधार माथी बांधला.

क्षितिज पायी विंधले अंधार माथी बांधुनी
रात्र होती वादळी अन् सोबतीला चांदणी.

सोबतीला चान्दणी, वृक्षछाया आणखी
घेतली खांद्यावरी मी वेदनांची पालखी.

त्यासवे मी दूर गेलो, दूर तम अन् कितितरी
स्वप्नगंधे, शून्य झालो, भग्न आणिक अन्तरी.

शुष्क झाले नयनकुम्भही डंख स्वप्नी लागलेला
भावना दाटून आल्या अन् म्हणालो चांदणीला
" चांदण्ये, तू जा आता, माझ्या व्यथेला अंत नाही
सोबतीला सावल्या, त्यांची जिवाला खंत नाही. "

——तरी मी तुला बजावलं होतं !
नाहीत पेलायची ही स्वप्नं
जीवघेणी
माझ्या हळव्या पापणकडांना.
उरातले गन्धजड भावपक्षी
नक्षी कोरीत अर्थांची...
नाहीच भिरभिरायचे
शब्दाशब्दांतून.
राहूच द्यायचा
त्यांचा मधाळ आशय
प्राजक्तातील मधु बिंदूप्रमाणे
ओठांच्या गहिऱ्या पाकळ्याआड.
पण तू पेटला होतास,
आसुसला होतास...
वृष्टी करायला शतधारांनी
—वांझ धरतीवर !
म्हणूनच अरे,
आज वेचणे आहे...
राख विझल्या स्वप्नांची
तुला अन्
मलाही.
——तरी मी तुला केवढं बजावलं होतं !

अस्वस्थ अंधारात
एक चिंधलं वेड
इळव्या डोळ्यात उगवलेलं.
झपाटल्या अन्तरातून
ढांसळते निःश्वास
अर्थांची किनार हरवलेले.
उद्ध्वस्त आभाळातले
सैरभैर पक्षी
केव्हाच निखळलेले.
... ... कदाचित आयुष्य म्हणजे
नग्न सत्यांची भग्न स्मशानदरी
... किंवा असंच ... बरंचसं काही.
क्षितीजातीत
पुसट पुसट होत गेलेलं
अधीऱ्या पावलांचं चिराळलं शिल्प.
अभोगी माथ्यावर ...
अभागी प्रश्नांची भलीमोठी उतरंड
उत्तरं गमावलेली.
बेफिकीर दुनिया मात्र सुन्न सुन्न!
... ...कदाचित आयुष्य म्हणजे
नग्न सत्यांची भग्न स्मशानदरी.
...किंवा असंच ... बरंचस काही !
... ... ... ... ...!!

एक धुवाँधार लाघवप्रहर
डोळ्यात बांधून
एका अर्धनिळ्या पहाटे
माझ्या दारी आलास –
सकंप मनात गंधस्वी सूर साक्षी ठेवून.
तुझ्या आदिम क्षितीजाच्या ओढीनं
स्पर्शगांधारासाठी तुझ्या
व्योमव्याकूळ माझी ओंजळ
वेडीपिशी झाली...
गहिरी सघन वेदना पांघरून !
आणि आता हे प्राक्तनी अपरिहार्य,
विझल्या आभाळात रुतलेली
विकल पांखरे धुंडणे !
तू मात्र, अरे,
खुशाल चालता झालास
माझ्या हळव्या डोहात
एका ढगाळ मनस्वी गच्च अंधाराचा
जोगवा फेकून.

जेव्हा माझी कविता ...
धूसरलेली तू ऐकशील,
ऐकू येईल तुला
माझ्या अन्तरीचं एक मूक आक्रंदन.
तुझ्या मनस्वी डोळ्यात
दोन अश्रू उभे राहतील ...
रंगात न भिजलेल्या
माझ्या कवितेच्या नावानं !
कारण ...
माझ्या कवितेत आहे
वेदनेनं कूस उजवलेली एक स्मशानदरी.
दिसतंय मला ...
तिच्या ओळी ओळीमध्ये
विवस्त्र क्षितिजाचं निःसंग प्रतिबिंब
आणि एक अनाहूत धुमसतं वादळ
जे बंद होतं एका नाजुकशा काचपात्रात !

अन् पुन्हा तूच खुणावतेस
अक्षरा अक्षरामागं दडून !
ठाऊकायत मला माझ्या व्यथा.
( व्यथांनो, खरंच मला ठाऊक असता तर ! )
आणि आता
त्याच गन्धगार व्यथा
छळतायत अंतर्मनाला
कवितेत लपून माझ्या !
म्हणूनच –
समर्पित करतोय्
ही कविता
तिला –
जिचं जुळलेलं जीवन संगीत
निसूर झालंय्...
माझ्यामुळं
— केवळ माझ्यामुळं !

मी असा एकान्तस्वामी राज्य हे जखमी खुणांचे !
कोणी ना येथे कुणाचे !!
सूर्यसाक्षी जन्मताती वेदना ह्या अन्तहीन !
विन्धती दाही दिशा अंधारकाटे मीपणाचे !
कोणी ना येथे कुणाचे !!
जाळिती देहास आता सावल्या गुल्‌मोहरी !
भोगणे कफनातुनी शाप क्षतविक्षत मनाचे !
कोणी ना येथे कुणाचे !!
मौन ही आभाळशिल्पे प्राक्तनी लिहिलीच होती !
जीवना रे, साहणे हे भार अश्रूंचे, तनाचे !
कोणी ना येथे कुणाचे !!
शिशिरस्वप्ने पेलुनी अन्‌ झेलुनी शतवादळे !
पालख्याही थकुनि जाती वाहुनी नाते व्रणांचे !
कोणी ना येथे कुणाचे !!

REFBK-0023570
REFBK-0023570